दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.१७ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २५४ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 17 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 254 | Pages 4 | Rate 4 Rs


## मनोज जरांगेंचे ३० तारखेपासून पुन्हा उपोषण

**मुंबई**–माझे देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल वाईट मत नाही. पण माझ्या समाजाचे वाटोळे होणार असेल तर मी तुम्हाला कोणालाच मोजणार नाही. मला मित्र नको, मंत्र्यांशी संबंध नको मला केवळ माझ्या समाजाचे लेकरं मोठी करायची आहेत. मी फडणवीस यांना दोष देत नाही माझं म्हणणं केवळ इतके आहे की हैदराबादचा जीआर काढला पण प्रमाणपत्र रोखले का नाही? ते आता बंद कसे झाले? तुम्हाला मुख्यमंत्री मराठ्यांनीच केले आहे हे लक्षात ठेवा, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. ३० तारखेपासून आंदोलन करणार असल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. ३० मे पूर्वी सर्वांना प्रमाणपत्र द्यावे, नाही तर ३० तारखेपासून आमरण उपोषण करणार, असे त्यांनी म्हटले आहे.मराठा आरक्षणासाठी सरकारने सातारा संस्थानच्या गॅझेटचा जीआर काढू असे सरकारने सांगितले होते पण तसे काही केले नाही, आंदोलन केल्याशिवाय सरकार काही ऐकत नाही.

# साताऱ्यातून मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी घोषणा : पुढील वर्षी १५ लाख घरांचे वितरण

## कर्जमाफी, शेतकरी मदत आणि 'लखपती दीदी' अभियानालाही वेग देणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने प्रधानमंत्री आवास योजनेत विक्रमी कामगिरी केली असून, एका वर्षात तब्बल पाच लाख घरे पूर्ण करून लाभार्थ्यांना चाव्यांचे वितरण करण्यात आले आहे. पुढील वर्षी आणखी १५ लाख घरांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.सातारा येथील सैनिक स्कूल मैदानावर आयोजित घरकुल वितरण सोहळ्यात ते बोलत होते. केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले , खासदार उदयनराजे भोसले माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर अतुल भोसले कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे कोरेगावचे आमदार महेश शिंदे सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रियाताई शिंदे उपाध्यक्ष राजू भोसले ग्रामविकास विभागा चे अप्पर सचिव चंद्रकांत पुलकुंडवार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



**सातारा । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०१६ ते २०२२ या कालावधीत केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्याला १२ लाख ९० हजार घरांचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यानंतर नव्याने अनेक गरजू कुटुंबांची नावे समोर आल्याने आणखी ३० लाख घरांची गरज निर्माण झाली. त्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात आला असून, पुढील दोन ते तीन वर्षांत मोठ्या प्रमाणात घरकुलांचे वितरण होणार आहे. राज्य सरकारकडून प्रत्येक घरकुलासाठी अतिरिक्त ५० हजार रुपयांची मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळालेल्या लाभार्थ्यांना सौरऊर्जेसाठी अनुदान देऊन आयुष्यभर मोफत वीज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.शेतकरी प्रश्नांवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असून केंद्र सरकारच्या सहकार्याने त्यांना दिलासा देण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबतही केंद्रीय स्तरावर बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.राज्य सरकार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सकारात्मक असून, ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्याची तयारी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याचाही निर्णय सरकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.महिलांच्या सक्षमीकरणावर भर देताना फडणवीस म्हणाले, गेल्या दोन वर्षांत राज्यातील ५० लाख महिलांना 'लखपती दीदी' बनविण्यात यश आले असून, हा आकडा एक कोटीपर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या अनावरणाचाही उल्लेख करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. हे सरकार सर्वसामान्य, शेतकरी आणि कामगारांचे सरकार आहे, असे सांगत त्यांनी उपस्थितांना देशहितासाठी ऊर्जा बचतीचे आवाहन केले.विक्रमी वेळेमध्ये ग्रामविकास विभागाने पाच लाख घरांचे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल ग्रामविकास विभाग त्या विभागाचे तत्कालीन सचिव आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे मुख्यमंत्र्यांनी तोंड भरून कौतुक केले .ग्रामविकास विभागाचे मंत्री जयकुमार यांनी घरकुल उद्दिष्ट पूर्तीचे शिव धनुष्य यशस्वीपणे पेलले अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले .

शिवराज सिंह चौहान म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील संपूर्ण जनतेला सुखकर जीवनासाठी वाक्या घरांचे महत्त्वकांक्षी उद्दिष्ट हातात घेतले असून महाराष्ट्रातील प्रशासन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पक्या घराच्या माध्यमातून पोहोचत आहे .पुढील वर्षी १५ लाख घरांचे वितरण कार्यक्रम करण्याच्या दृष्टीने पुन्हा लाडक्या भावांचे आणि बहिणींचे अर्ज मागविण्यात येत आहेत सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने केंद्रीय ग्रामविकास मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्याची ग्रामविकास विभाग सातत्याने कार्यरत आहोत .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत घडवण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी संघटितपणे एकत्र काम करूया पुढच्या वेळेला पुन्हा येथे कार्यक्रमासाठी येण्याकरता मला नक्की आवडेल असे कौतुक उद्गार शिवराज सिंह चौहान उर्फ मामाजी यांनी काढले .ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले महाराष्ट्राला ३० लाख घरांचे उद्दिष्ट मिळाले होते .पैकी पाच लाख घरांचे विक्रमी वेळेमध्ये करण्यात आलेले वितरण यामध्ये ग्रामविकास विभागाचे सर्व प्रशासन आणि संबंधित अधिकारी यांच्या संघटित प्रयत्नाला यश आले आहे .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या भविष्याच्या दृष्टीने आपल्याला काही काटकसरीचे मंत्र दिले असून त्याची अंमलबजावणी करणे हे आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे .मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या आदेशानुसार पुढील वर्षी १५ लाख घरांची बांधणी करून त्याच्याही घरांचे वितरण तातडीने करण्याच्या दृष्टीने ग्रामविकास यंत्रणा कधीही कमी पडणार नाही .

# मुंबईत उभारणार १.१४ लाख कोटींचे 'ग्रीन डेटा सेंटर पार्क'; ८ हजार रोजगारांची संधी

### महाराष्ट्र सरकार आणि एएम इंटेलिजन्स लॅब्समध्ये सामंजस्य करार; राज्याला लाभणार 'एआय'ची नवी दिशा



**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याला देशातील 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरची राजधानी बनवण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई महानगर प्रदेशात (MMR) ५०० मेगावॅट क्षमतेचे 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारण्यासाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी तब्बल १,१४,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रस्ताव असून, यातून राज्यात सुमारे ८ हजार थेट रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि महत्त्व

हा प्रकल्प पूर्णपणे नवीकरणीय (Green) ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करत तंत्रज्ञानाचा विकास साधला जाईल. यामध्ये प्रामुख्याने

सुविधा उपलब्ध असतील:

एआय मॉडेल प्रशिक्षण: मोठ्या प्रमाणावर एआय मॉडेल्सचे प्रशिक्षण आणि विकास.

डेटा प्रोसेसिंग: प्रगत डेटा हाताळणी यंत्रणा.

क्लाउड सेवा: क्लाउड आधारित अत्याधुनिक एआय सेवांची उपलब्धता.

या प्रकल्पामुळे महाराष्ट्रात केवळ गुंतवणूक आणि रोजगारच वाढणार नाहीत, तर तंत्रज्ञान विकास आणि हरित ऊर्जा क्षेत्रालाही मोठी गती मिळणार आहे. महाराष्ट्राला तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक नकाशावर अग्रस्थानी नेण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या सामंजस्य करार प्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत, 'एएम इंटेलिजन्स लॅब्स'चे प्रतिनिधी आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या गुंतवणुकीमुळे मुंबई महानगर प्रदेशाचा चेहरामोहरा बदलणार असून, आयटी क्षेत्रातील तरुणांसाठी मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

# नांदेड जिल्ह्यात उद्यापासून जनगणनेचा श्रीगणेशा

## नागरिकांनी सहकार्य करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

### उन्हाचा कडाका लक्षात घेता सकाळी व संध्याकाळी काम करण्याच्या प्रगणकांना सूचना

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यात 'जनगणना २०२७' अंतर्गत घरयादी आणि घरगणनेच्या पहिल्या टप्प्याला उद्या, १६ मेपासून प्रत्यक्ष सुरुवात होत आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी राहुल कर्डिले यांनी नागरिकांना प्रगणक आणि पर्यवेक्षकांना आवश्यक ते सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

या महत्त्वपूर्ण मोहिमेसाठी प्रत्येक नागरिकाच्या घरी प्रगणक (माहिती गोळा करणारे) आणि पर्यवेक्षक भेट देणार आहेत. सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड असल्याने प्रगणक व पर्यवेक्षकांना उन्हाचा त्रास होऊ नये, म्हणून त्यांनी जनगणनेचे काम शक्यतो सकाळी आणि सायंकाळच्या सत्रात पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.



आपल्या घरी येणाऱ्या प्रगणक आणि पर्यवेक्षकांशी नागरिकांनी 'अतिथी देवो भवः' या भावनेतून सन्मानाने वागावे. तसेच उन्हाची वाढती दाहकता पाहता त्यांना पाण्याची विचारपूस करावी, असे भावनिक आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेडकरांना केले आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या या देशव्यापी कामासाठी त्यांनी सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांना शुभेच्छा दिल्या.

**उन्हापासून काळजी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन**

निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी किरण अंबेकर, मुंबई जनगणना कार्यालयाचे सहायक संचालक बी. प्रसाद, जिल्हा जनगणना समन्वय अधिकारी नेहाल धुरंधरे आणि तहसीलदार (महसूल) तथा जिल्हा जनगणना कक्ष प्रमुख विपिन पाटील यांनीही ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षकांनी उन्हापासून स्वतःच्या संरक्षणाची योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन केले आहे.

# यवतमाळच्या पीक विम्यासाठी आमदार किसनराव वानखडे आक्रमक; मुंबईत कृषिमंत्र्यांची भेट घेऊन घातले साकडे

**दैनिक वादळ वार्ता**
**यवतमाळ । प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी सध्या नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक संकटाच्या दुहेरी कात्रीत सापडला आहे. अशातच जिल्ह्याला पीक विम्याच्या मदतीतून वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी आक्रमक पवित्रा घेत मुंबईत शासन दरबारी जोरदार पाठपुरावा सुरू केला असून, आज राज्याचे कृषिमंत्री नामदार श्री. दत्ता मामा भरणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन यवतमाळच्या शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडले.

यवतमाळ हा मुख्यत्वे कापूस आणि सोयाबीन उत्पादक जिल्हा आहे. मात्र, मागील काही काळात झालेला अवकाळी पाऊस, पावसाचा खंड आणि वाढता कीड प्रादुर्भाव यामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. आमदारांनी कृषिमंत्र्यांचे लक्ष वेधले की, जिल्ह्यातील शेतकरी आधीच उद्ध्वस्त झाला असून, पीक विमा हाच त्यांच्यासाठी शेवटचा आधार आहे. अशा वेळी यवतमाळला मदतीपासून वंचित ठेवणे हा शेतकऱ्यांवर मोठा अन्याय आहे.

यापूर्वी आमदार वानखेडे यांनी मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन जिल्ह्याच्या पीक परिस्थितीचा सविस्तर अहवाल सादर केला होता. त्यानंतर आज कृषिमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी तांत्रिक त्रुटी दूर करून यवतमाळ जिल्ह्याला तात्काळ पीक विमा मदत यादीत समाविष्ट करण्याची आग्रही मागणी केली. अनेक गावांमधील पिकांच्या नुकसानीची दाहकता त्यांनी यावेळी मंत्र्यांसमोर मांडली.आमदार वानखेडे यांनी मांडलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. पीक विमा संदर्भातील सर्व तांत्रिक अडचणी तातडीने तपासून यवतमाळ जिल्ह्याला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.आमदारांच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. जर शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन विमा मदत जाहीर केली, तर हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. आता राज्य शासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

## जरा गांभीर्याने घ्या...

या आठवड्यामध्ये वैद्यकीय पदवी प्रवेशांसाठी घेण्यात आलेल्या 'नीट' परीक्षेचे पेपर फुटल्यामुळे ती संपूर्ण परीक्षा रद्द करून आता पुन्हा नव्याने घेण्याचा निर्णय झाला. आता दोन महिन्यांच्या अंतराने ती परीक्षा पुन्हा होईल. या परीक्षेला बसलेले काही लाख विद्यार्थी व त्यांचे पालक यामुळे निराश झाले असतील; पण या सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा या परीक्षेच्या तयारीसाठी कंबर कसावी लागेल. परीक्षा झाली म्हणून आलेला निवांतपणा झटकून पुन्हा एकदा परीक्षेची तयारी करणे, त्यासाठी मानसिक तयारी करणे आणि पुन्हा एकदा आपला अभ्यास त्या पातळीवर नेण्यासाठी धडपडणे ही खरोखरच अवघड गोष्ट आहे; किंबहुना ते मोठे आव्हान आहे. पण कोणाच्या तरी हव्यासाची शिक्षा लक्षावधी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना मिळाली, हे नक्की.

या सगळ्याकडे मुळातून बघण्याची गरज आहे. वैद्यकीय शिक्षण हे आपल्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये सर्वोच्च स्थानावर आहे. याचे मूळ कारण म्हणजे हे शिक्षण घेण्याची संधी अतिशय मर्यादित आहे. स्वातंत्र्यानंतर आपण आरोग्य व्यवस्थेवर पुरेसे काम केलेले नाही. अजूनही परिस्थिती तशीच आहे. मलेशिया, थायलंड, सिंगापूर या सारख्या देशांमध्येही सरकारी आरोग्यव्यवस्था ही नव्वद ते पंचाण्णव टक्के नागरिकांच्या आरोग्याची सोय करते. ती अत्यल्प पैशांमध्ये मिळते. अमेरिका व युरोपमध्ये आरोग्यविमा तुमच्या खर्चाची काळजी घेतो. दुर्दैवाने आपण या दोन्ही पद्धतींकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. आपल्याकडची सरकारी रुग्णालये कितीही चांगले काम करत असली तरी त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांची संख्याच इतकी प्रचंड असते की ही व्यवस्था कोलमडून पडते. आजही मुंबईच्या जेजे किंवा पुण्यातल्या ससून रुग्णालयांमध्ये मंजूर रुग्णसंख्येच्या किमान दुप्पट रुग्ण दाखल असतात, मग त्यांची सोय जमिनीवरील बेडवरच केली जाते, यात आश्चर्य नाही.हीच गोष्ट वैद्यकीय शिक्षणाची. हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच वैद्यकीय महाविद्यालये, त्यामुळे त्यामध्ये प्रवेश मिळणे ही फार मोठी गोष्ट समजली जाते. पूर्वी बारावीच्या परीक्षेतील गुणांवर हे प्रवेश मिळत. मात्र स्पर्धा तीव्र झाल्यानंतर या प्रवेशांसाठी वेगळी प्रवेश परीक्षा आली. मग संपूर्ण देशामध्ये एकच प्रवेश परीक्षा हवी यातून 'नीट'सारख्या परीक्षेचा जन्म झाला. त्यासाठी वेगळी यंत्रणा उभी राहिली. दुर्दैवाने ही यंत्रणा पुरेशी सक्षम नाही. कारण गेल्या तीन वर्षांत अशा प्रकारे प्रवेश परीक्षेचे पेपर फुटण्याची ही दुसरी वेळ आहे. आता ही परीक्षा जून महिन्यात होईल. त्यानंतर निकाल लागण्यासाठी किमान महिना ते दीड महिना लागेल. मग प्रवेश प्रक्रिया. त्यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील राखीव प्रवेश, राज्यस्तरावरील प्रवेश, विविध आरक्षणे.... हे होताना त्यामध्ये न्यायालयातील याचिका असतीलच. त्यामुळे हे प्रवेश पूर्ण होऊन प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू होण्यासाठी सप्टेंबर महिना उजाडेल. वास्तवामध्ये पहिले सत्र ऑक्टोबर महिन्यात संपणे अपेक्षित असते.वैद्यकीय प्रवेशासाठीची स्पर्धा अतिशय तीव्र बनल्याने त्याच्या तयारीसाठी कोचिंग क्लासेस आले. आता तर दहावीच्या आधीपासूनच या परीक्षांची तयारी करून घेणारे क्लासेस आहेत. त्यासाठी पालक लक्षावधी रुपये खर्च करतात. त्यासाठी गाव, घर सोडून मोठ्या शहरांमध्ये दोन–अडीच वर्षांसाठी राहण्यास येणाऱ्यांची संख्या हजारांमध्ये आहे. पूर्वी आयएएस परीक्षेसाठी दिल्लीमध्ये जायची पद्धत होती. मग आयआयटीसाठी कोटा प्रसिद्ध झाले; आता या वैद्यकीय शिक्षणासाठी सर्व महानगरे प्रसिद्ध आहेत. तेथे मोठमोठ्या कोचिंग क्लासच्या चकचकीत इमारती आहेत, त्यांचे मोठे शुल्क आहे. परवडते त्यांनी या वाटेला जावे. गरिबाने जमले तर परीक्षा देऊन बघावी, मिळाले यश तर प्रवेश घ्यावा; अन्यथा वेगळी वाट निवडावी, असा हा सगळा रोकडा व्यवहार. फीचा आकडा दर वर्षी वाढवायचा तर जाहिरात करण्यासाठी आपल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे. त्यासाठी प्रश्नपत्रिकाच फोडली तर काम अधिक सोपे होईल, अशा चक्रव्यूहातून ही स्थिती निर्माण होते. आताही उघडकीस येत असलेला प्रकार याच साखळीतला आहे. एका प्राध्यापकाला झालेली अटक याकडे अंगुलीनिर्देश करते आहे.हे सगळे उघडकीला आल्यानंतर अनेक प्रश्न पडतात. राष्ट्रीय स्तरावरील एकच परीक्षा घेण्याचा अट्टाहास का, येथपासून ते एवढे तंत्रज्ञान विकसित झाल्यानंतरही पेपरफुटी होतेच कशी, येथपर्यंतचे हे प्रश्न आहेत. आता पुढील वर्षी ही परीक्षा संगणकाद्वारे घेण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे, पण या वर्षी झालेल्या मनस्तापाची किंमत कोण मोजणार, याचे उत्तर केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेले नाही. एकूणच आपण या प्रकाराकडे अजूनही गंभीरपणे बघण्यास तयार नाही, असेच चित्र उभे राहते.अर्थात आपण कशातच गंभीर नाही, हे वारंवार दिसतेच. याच आठवड्यात पंतप्रधानांनी एकूण जागतिक परिस्थिती पाहून बचतीचे आवाहन केले आहे. सोने खरेदी करू नका, परदेश प्रवास टाळा येथपासून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरा येथपर्यंतचे ते आवाहन आहे. ते गरजेचे होते का, निवडणुका संपेपर्यंत ते करण्यास विलंब का केला, येथपासून स्वतः पंतप्रधान त्याकडे गंभीरपणे बघणार का. येथपर्यंत अनेक प्रश्न निर्माण होतात. ही उत्तरे मागताना या प्रकरणातील गांभीर्यच आपण घालवितो आहोत, हे मात्र आपण विसरतो. युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन उपलब्धतेवर मोठा परिणाम होणार आहे व त्यासाठी मोठे परकीय चलन खर्ची टाकावे लागणार आहे, हे प्रत्येकाला माहिती आहे. सोने तातडीने खरेदी केले नाही तरी फार काही बिघडणार नाही, हेही आपल्याला माहिती आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर सार्वजनिक जीवनामध्ये असलेल्यांनी केला पाहिजे यामध्ये काहीच नवीन नाही. पण याकडे दुर्लक्ष करून त्याची चर्चा करण्यात व जाहिरातबाजी करण्याकडे आपला कल आहे. पंतप्रधानांच्या ताफ्यात दोनच गाड्या येथपासून ते मुख्यमंत्री मोटारसायकलवरून मंत्रालयात, तर महापौर सायकलवरून महापालिकेमध्ये येथपर्यंत सगळे वाजवून सांगितले जात आहे. मुळात पंतप्रधानांच्या ताफ्यामध्ये एरवी यापेक्षा अधिक गाड्या का असतात, त्याची गरज का असते हे कोणी सांगणार नाही. मुख्यमंत्र्यांनी मोटारसायकलवरून जाणे योग्य आहे का, वाटेत अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोणाची, असे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे पंतप्रधानांच्या आवाहनाला आपापली जबाबदारी ओळखून प्रतिसाद देणे योग्य. ते करताना तरतम भाव बाळगला पाहिजे. प्रसिद्धीसाठी एक दिवस स्तोम माजविण्यात अर्थ नाही. या सगळ्याकडे गांभीर्याने बघायला हवेच; पण त्याचबरोबर हा साधेपणा फक्त युद्धजन्य परिस्थितीत नाही तर कायमस्वरूपी असायला हवा. गोव्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर स्कूटरवरून सकाळी मंत्रालयात जात, पण त्याच्या कधी बातम्या झाल्या नाहीत. लोकांनाही त्याचे अप्रूप वाटत नव्हते, ना मुख्यमंत्र्यांना आपण काही तरी वेगळे करतो आहोत असे वाटत होते. हीच भावना कायमस्वरूपी हवी.शेवटी मुद्दा तोच आहे. 'नीट'च्या परीक्षेचे संचलन असो किंवा पंतप्रधानांच्या आवाहनाला द्यायचा प्रतिसाद, या सगळ्याकडेच पुरेशा गांभीर्याने आणि सातत्याने बघण्याची गरज आहे. उगाचच प्रत्येक गोष्टीची जाहिरात आणि प्रसिद्धी करून आपण नक्की काय साध्य करणार?

# आजच्या राजकारणात अर्थकारण–गणेश नाईक

## आगरी समाजाचा मला सार्थ अभिमान–महेंद्रशेठ घरत






दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

दुसऱ्याच्या आयुष्यातील सुख ओरबाडल्यास आपल्याला सुख लाभत नाही. त्यांना वातानुकूलित दालनातही घाम फुटतो. प्राणी असो वा माणूस आपल्या पोटच्या गोळ्याला कधीही कुणी पायदळी तुडवत नाही. एकेकाळी आगरी समाजाला खूप बदनाम केले गेले. मात्र तो काळ गेला, आज समाजाची प्रगती सर्वच बाबतीत निश्चितच चांगल्या प्रकारे होत आहे. स्वाभिमानाने आपला पुढे जात आहे. मी सामाजिक बांधिलकी जपून काम करीत आहे, मात्र आजच्या राजकारणात अर्थकारणाशिवाय काही नाही, असे वनमंत्री गणेश नाईक पेण येथे म्हणाले. पेण येथे शुक्रवारी (ता. १५) अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्था आयोजित राष्ट्रीय आगरी आध्यात्मिक संमेलन पार पडले. त्याचे उदघाटन वनमंत्री गणेश नाईक, आमदार रवींद्र पाटील, आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, आगरी समाजाची ताकद मोठी आहे, परंतु समाज विखुरला आहे. आज आगरी समाज एकसंध झाला तर रायगड, ठाणे येथील सर्व आमदार, खासदार आगरी समाजाचेच होतील. मी जिल्हा परिषद सदस्य होताच सर्वप्रथम जलकुंभ उभारून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवला. आगरी समाजासाठी मी सर्व प्रकारचे सहकार्य करीत आलो आहे आणि करीतच राहीन. कारण आगरी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. मात्र दिबांचे नाव अद्यापही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिले जात नाही, ही शोकांतिका आहे. त्यामुळे समाज पेटून उठला पाहिजे. सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवायला हवी. आज आगरी समाजातील असंख्य तरुण, तरुण उच्च शिक्षण घेत आहेत, हे अभिमानास्पद आहे. आपला आगरी समाज स्वाभिमानी आहे, छत्रपती शिवाजी महाराजांनीही आगरी समाजावर अतोनात प्रेम केले. शिवरायांच्या काळातही आगरी समाजाचे योगदान अनन्यसाधारण आहे, मात्र आताच्या राज्यकर्त्यांना दिबांच्या नावाचा विसर पडला आहे. त्यांना आगरी समाजाचे योगदान कळत नाही. त्यामुळे येत्या काळात आगरी समाजाची एकजूट कायम हवी. नाही तर रात्र वैऱ्याची आहे, हे समाजातील नेत्यांनीही लक्षात घ्यावे. आगरी समाजासाठी मी काम करतो. समाजासाठी सर्वकाही सहकार्य करतो आणि यापुढेही करायला तयार आहे. मी आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत असलो तरी माझी सही मी मराठीत करतो. आगरी माणसाने आगरी समाजाला साथ दिली पाहिजे. तरच समाज कुठेतरी जिवंत राहील.यावेळी पेणचे आमदार रवींद्र पाटील, पुरुषोत्तम महाराज यांनीही आपले विचार मांडले. प्रास्ताविक सूर्यकांत पाटील यांनी केले. यावेळी 'वारी देवाची' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तबलावादक प्रताप पाटील, जगदीश पाटील, संजीवन म्हात्रे, तसेच समाजातील अनेक मान्यवर मंडळींचा यावेळी सत्कार करण्यात आला. आगरी समाजाचे कार्य म्हणून यावेळी दोन लाख रुपयांची देणगी महेंद्रशेठ घरत यांनी दिली. समाजाचे उपकार कधीही विसरणार नाही, ज्यांच्या नावात इंद्र आहे, ते महेंद्रशेठ घरत असे सुप्रसिद्ध गायक जगदीश पाटील म्हणाले. यावेळी 'माझा आगरी आगरी जाम हाय स्वाभिमानी' हे गाणे त्यांनी गाऊन रसिकांना जिंकले.

# पालखी महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करा; गडकरींकडे निवेदन



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील काटेवाडी ते इंदापूर तालुक्यातील सराटी गावादरम्यान अनेक वर्षांपासून रखडलेल्या श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या अपूर्ण कामाबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी प्रदीप गारटकर व युवा नेते प्रवीण माने यांच्या वतीने करण्यात आली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील इतर अनेक भागांमध्ये श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम पूर्ण झालेले असताना, इंदापूर तालुक्यातील काटेवाडी ते सराटी हा महत्त्वाचा टप्पा अद्यापही अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक, प्रवासी, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी तसेच वारकरी बांधवांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः दरवर्षी होणाऱ्या संत तुकाराम पालखीच्या दरम्यान या मार्गावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. अशा परिस्थितीत अपूर्ण रस्त्याचे काम नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर समस्या बनले आहे. खराब आणि अर्धवट रस्त्यामुळे वाहतूक कोंडी, धुळीचे वाढते प्रमाण तसेच अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

या मार्गावर गेल्या काही वर्षांत अनेक अपघात घडले असून, त्यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर काही नागरिक कायमस्वरूपी अपंगत्वाला सामोरे गेले आहेत. त्यामुळे परिसरात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर बारामती तालुक्यातील काटेवाडी ते इंदापूर तालुक्यातील सराटी गावापर्यंतच्या पालखी महामार्गाचे उर्वरित काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागास निर्देश द्यावेत, अशी मागणी गारटकर व माने यांनी निवेदनाद्वारे केली आहे.रस्त्याचे काम लवकर पूर्ण झाल्यास नागरिकांना सुरक्षित, सुलभ व वेगवान प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल तसेच अपघातांना मोठ्या प्रमाणात आळा बसेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या पालखी मार्गाकडे केंद्र शासनाने प्राधान्याने लक्ष द्यावे, अशीही नम्र विनंती करण्यात आली आहे.



# संजय भोकरे यांना पोलीस संरक्षणाची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची मागणी

## संरक्षण देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश


दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**


भोकरे यांना मि पुर्णपणे ओळखतो त्यांनी पत्रकारीता शैक्षणिक सामाजिक कार्यात मोलाचे योगदान असून अशा लोकांची सुरक्षा करणे हे आमच्या सरकारचे कामं आहे तर त्यांना पोलीस संरक्षण देण्याचे आदेश दिले आहे तर सांगलीत घटनेचा निषेध व्यक्त केला महाराष्ट्र राज्य हे सुजलाम सुफलाम राज्य असुन गुंडागिरीचा बंदोबस्त करण्यासाठी आमचे सरकार या प्रकरणात लक्ष घातले असून पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा यांच्या कडुन माहिती प्राप्त झाली आहे पोलीस यंत्रणा या प्रकरणाचा छडा लावण्यात यशस्वी ठरेल असा मला विश्वास असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना सांगितले महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट सांगली पोलिसांनी उधळून लावला आहे. या प्रकरणी तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून पिस्तूल आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, भोकरे यांना तातडीने राज्य भरात फिरताना पोलीस संरक्षण देण्याची मागणी आज पत्रकार संघाने मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मंत्रालयात प्रत्यक्ष भेटून केली आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ. विश्वास आरोटे, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव मंत्रालय संपर्कप्रमुख विष्णू बुरे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसेडर संजय फुलसुंदर, आणि संघाचे सदस्य खंडूराज गायकवाड यांचा शिष्टमंडळात समावेश होता. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री.भोकरे यांना संरक्षण देण्याची मागणी मान्य केली.

# मुंबई–गोवा महामार्गावर मृत्यूचा थरार; तुरळ येथे उभ्या कंटेनरवर टेम्पोची भीषण धडक

## चालक रक्ताच्या थारोळ्यात, महामार्ग पुन्हा हादरला



दैनिक वादळ वार्ता
**संगमेश्वर । प्रतिनिधी**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर संगमेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसतानाच आज शुक्रवारी तूरळ येथे आणखी एक भीषण अपघात घडला. दुपारी पावणे बाराच्या सुमारास गणपती मंदिराजवळ भरधाव वेगातील टेम्पोने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात टेम्पो चालक गंभीर जखमी झाला असून अपघातानंतरचे दृश्य अंगावर काटा आणणारे होते.एमएच १३ डी ०६८०३ क्रमांकाचा टेम्पो टीएन ८८ एल १६३१ क्रमांकाच्या कंटेनरवर आदळल्यानंतर महामार्गावर पलटी झाला. धडक इतकी भीषण होती की टेम्पोच्या केबिनचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. चालक रितेश पाटील (रा. कोल्हापूर) हा रक्ताच्या थारोळ्यात केबिनमध्ये अडकून पडला होता. अपघातस्थळी सर्वत्र रक्ताचा सडा पसरल्याने उपस्थित नागरिक हादरून गेले.

घटनेची माहिती मिळताच राजवाडी येथील सचिन सुर्वे यांनी पत्रकार मिलिंद चव्हाण यांना कळवले. त्यानंतर मिलिंद चव्हाण यांनी सहकारी आणि रिक्षा व्यावसायिक राजेंद्र भोजने, उदय चव्हाण, दत्ताराम उजगावकर, दिनेश निवळेकर, सचिन हरेकर, जयदीप फडकले आणि शैलेश फडकले यांच्यासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी चालकाला बाहेर काढण्यासाठी सर्वांनी शर्थीचे प्रयत्न केले.मिलिंद चव्हाण यांनी तत्काळ १०८ रुग्णवाहिकेशी संपर्क साधून जखमी चालकाला संगमेश्वर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. रमीज यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर चालकाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले.दरम्यान, महामार्ग पोलीस पथकातील रियाज मुजावर, सोमनाथ आव्हाड आणि बळीराम शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने बाजूला करत वाहतूक सुरळीत केली.मुंबई–गोवा महामार्गावरील तूरळ परिसरात गेल्या काही दिवसांत अपघातांची मालिका सुरूच आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी खासगी बस आणि रिक्षामध्ये भीषण धडक होऊन अनेक जण गंभीर जखमी झाले होते. त्याचप्रमाणे तळेकांटे परिसरातही दोन वाहनांचा अपघात घडला होता.आरवली ते तळेकांटे या पट्ट्यात गेल्या वर्षभरात अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले असून अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. वारंवार होणाऱ्या या भीषण अपघातांमुळे वाहनचालक आणि स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महामार्गावरील धोकादायक ठिकाणांची तातडीने पाहणी करून सुरक्षाविषयक ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# दोन व्यक्तीं कडून १ लाख १९ हजारांचा विदेशी दारूसाठा जप्त

## १ लाख १९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड ग्रामीण पोलिसांनी विदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्या दोन इसमांविरुद्ध मोठी कारवाई करत तब्बल १ लाख १९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५४१/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (अ), ६५ (ई) व ८३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस शिपाई मारोती शंकर पंचलिंग, नेमणूक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांनी फिर्याद दिली आहे. पोलीसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, दिनांक १२ मे २०२६ रोजी दुपारी १.१० वाजताच्या सुमारास कृषी उद्योग गेटजवळ, चंदासिंग कॉर्नरकडे जाणाऱ्या रोडवर छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान दोन संशयित इसमांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत
१) पल्ले स्वामी गोंड (वय ४१), व्यवसाय मजुरी, रा. मचारेड्डी फरीदपेट, जिल्हा निजामाबाद, तेलंगणा
२) यादगीर नारायण परकी (वय ४६), व्यवसाय मजुरी, रा. पेदा गंडलेल्ली, जिल्हा सिद्धीपेट, तेलंगणा

आरोपींकडून विदेशी दारूच्या १८० एमएलच्या एकूण १९८ बाटल्या तसेच एक स्कुटी असा एकूण १ लाख १९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या देखरेखीखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, वसंत केंद्रे, विनोद पवार, मारोती पंचलिंग, शंकर माळगे, समीर अहमद, धर्मपाल कांबळे आदींच्या पथकाने ही धडक कारवाई पार पाडली. दरम्यान, अवैध दारू विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.



## बजाज कृषी महाविद्यालयाच्या कृषिदूतांची रचना फार्म्स येथे अभ्यासभेट; विद्यार्थ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची ओळख




**दैनिक वादळ वार्ता**
**वर्धा । प्रतिनिधी**

ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत बजाज कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील कृषिदूत विद्यार्थ्यांनी कान्होलीबारा येथील रचना ऑरगॅनिक अँड नॅचरल फार्म्स प्रा. लि. येथे शैक्षणिक अभ्यासभेट दिली.या अभ्यासभेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कंपनीची कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया, आधुनिक कृषी तंत्रज्ञान तसेच वापरात असलेल्या यंत्रणांची सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उत्पादन क्षेत्राला भेट देत कामकाजाचा अभ्यास केला आणि कंपनीतील अधिकारी वर्गाशी संवाद साधत व्यावसायिक कौशल्यांचे ज्ञान आत्मसात केले.या भेटीसाठी आवश्यक परवानगी रचना फार्म्सच्या व्यवस्थापनाकडून घेण्यात आली होती. या संपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी हेमंत कुकडे यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

या अभ्यासभेटीत साहिल वंजारी, सुजित राठोड, प्रणव संगई, प्रतीक काळे व प्रज्वल वांदिले या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्नेहल देशमुख, कार्यक्रम समन्वयक राजेंद्र खर्चे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. कविता चोपडे व आकाश लेवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या भेटीतून विद्यार्थ्यांना कृषी उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव मिळाला असून, भविष्यातील करिअरसाठी दिशा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. रचना फार्म्सच्या व्यवस्थापनानेही विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक करत, कृषी क्षेत्रात त्यांचे योगदान वाढावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

## धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अमरनाथ यात्रेकरूंची सामूहिक प्रतिज्ञा

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

अमरनाथ यात्री संघाच्या वतीने आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली इंधन बचत, स्वदेशीचा वापर, अनावश्यक खर्च टाळणे तसेच देशहित जपण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.संकल्प यावेळी करण्यात आला. विशेष म्हणजे, भारतात सर्वप्रथम असा उपक्रम नांदेड येथे राबविण्यात आला.*



अमरनाथ यात्रा अत्यंत अवघड व खडतर असल्याने यात्रेकरूंना शारीरिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गेल्या २६ वर्षांपासून सलग तीन महिने दररोज सकाळी नियमित वॉकिंग, ओपन जिममधील व्यायाम तसेच प्राणायाम घेतला जात आहे. शरीरासोबत मनही प्रसन्न राहावे यासाठी दररोज विनोद सांगण्याचाही उपक्रम राबविला जात असून त्यामुळे वातावरणात उत्साह व सकारात्मकता निर्माण होत आहे.यावर्षी यात्रेकरूंची संख्या वाढल्यामुळे ३ व १७ जुलै रोजी दोन वेगवेगळे जथ्थे अमरनाथ यात्रेसाठी रवाना होणार आहेत. संपूर्ण भारतात फक्त नांदेड येथेच यात्रेकरूंची अशा प्रकारे पूर्वतयारी केली जाते, असे आयोजकांनी सांगितले.

बुधवारी सकाळी झालेल्या कार्यक्रमात सुभाष देवकत्ते यांनी चालण्याचे महत्त्व विषद केले. संजय चौधरी यांनी ऑनलाईन बुकिंगविषयी माहिती दिली. छाया चौधरी यांनी भजन सादर केले, तर साईप्रसाद हळदे यांनी ओपन जिमचे फायदे समजावून सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या राजश्री हुरणे यांचा सत्कार जयश्री ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी दिलीप ठाकूर यांनी उपस्थितांकडून सामूहिक शपथ वदवून घेतली. प्रसंगी मंदाकिनी सुरनर, गौरी व साईप्रसाद देवकत्ते, शर्मिला व प्रशांत होट्टे, वंदना व हनुमानसिंह चौहान, सुचित्रा व प्रल्हादराव नवघरे, कैलाश महाराज वैष्णव, संगीता व प्रशांत जोशी, अन्नपूर्णा व श्यामराव खराणे, सलोना व विजयसिंह चव्हाण, छायाबाई व अशोक दालपे, शोभा व नारायण चव्हाण, राधा व किशन चव्हाण, श्रीकांत अकोलकर, नंदा व भारत चव्हाण, गंगामणी व बजरंग खंदारे, भाग्यश्री व नामदेव पांचाळ, मीरा व जयप्रकाश येवले, मीना व विश्वनाथ झुंजारे तसेच मेधा व रणजीत धर्मापुरीकर यांनी देश प्रथम ही भावना जपत राष्ट्रहितासाठी सदैव कार्यरत राहण्याची ग्वाही दिली. यात्रेकरूंमध्ये मोठा उत्साह दिसून येत असून निरोगी शरीर, सकारात्मक मन आणि राष्ट्रभक्तीची भावना या त्रिसूत्रीवर विशेष भर दिला जात आहे.


## औसा मतदारसंघातील १० तीर्थक्षेत्रांना 'क' वर्ग दर्जा

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा विधानसभा मतदारसंघाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेला बळ देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला असून मतदारसंघातील तब्बल १० तीर्थक्षेत्रांना 'क वर्ग' दर्जा मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे मंदिर परिसरातील विकासकामांना गती मिळणार असून भाविकांसाठी विविध मूलभूत सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.गावागावातील धार्मिक स्थळांचा सर्वांगीण विकास व्हावा, भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच धार्मिक पर्यटनाला चालना मिळावी या उद्देशाने शासनाने हा निर्णय घेतला आहे. दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. अभिमन्यू पवार यांनीपालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे विविध तीर्थक्षेत्रांना 'क वर्ग' दर्जा देण्याची मागणी केली होती. शासनाने या मागणीची सकारात्मक दखल घेत हा निर्णय जाहीर केला. 'क वर्ग' दर्जा प्राप्त झालेल्या तीर्थक्षेत्रांमध्ये हनुमान मंदिर देवस्थान (ब्राह्मण गल्ली, औसा), गजानन महाराज मंदिर (औसा), तक्षशिला बौद्ध विहार (औसा), गोपाळबुवा देवस्थान (माळकोंडजी), हनुमान मंदिर देवस्थान (याकतपूर), व्यंकटेश बालाजी मंदिर देवस्थान (दावतपूर), नृसिंह मंदिर देवस्थान (फत्तेपूर), खंडोबा मंदिर देवस्थान (आशिव), तुकाराम महाराज देवस्थान (हासुरी बु., ता. निलंगा) तसेच संत सेवालाल महाराज देवस्थान (एकंबी तांडा) यांचा समावेश आहे.



## धाडसी चोरी ; घरातून १७ तोळे सोने,५० तोळे चांदी  रोख ४ लाख रूपयेची चोरी




**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । प्रतिनिधी**

लातूर शहरामध्ये अनसार नगर ताजोद्दीन बाबा दर्गाह रोड येथील मोहम्मद पाशामिया शेख जे व्यवसायाने गुत्तेदार आहेत त्यांच्या घरी रिसेप्शन चे कार्यक्रम असल्या कारणाने ते घराला कुलुप लावून सुमारे ८:३० वाजता कार्यक्रम स्थळी गेले याचाच फायदा घेत घराचे कुलूप तोडून चोरांनी आत प्रवेश करून कपाटातील १७ तोळे सोन्याचे दागिने व ५० तोळे चांदी व रोख ४ लाख रूपये असा एकूण १० लाख २६ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.लातूर शहरातील अन्सार नगर ताजोद्दीनबाबा दर्गाह रोड या परिसरात महमद पाशामियॉ शेख (गुत्तेदार) यांचे घर आहे. चोरट्यांनी ११ मे रोजी रात्री साडेआठ ते साडेबारा वाजण्याच्या सुमारास घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कपाट फोडून कपाटामध्ये ठेवलेल्या सोन्याच्या छोट्या-मोठ्या अनेक अंगठ्या, लॉकेट, बिलवरी रिंग, गंठन, टॉप्स आदी सोन्याचे १४ तोळे वजनाचे दागिने तसेच ५० तोळे चांदी व रोख ४ लाख रूपये चोरून नेली आहे. शहरामध्ये लक्ष ठेऊन, घराला कुलूप पाहून चोऱ्या करण्याचे प्रयत्न बरेच होत आहेत. नागरिकांनी अशावेळी दक्षता घेण्याची गरज निर्माण झाली आहे. रात्रीच्या वेळी शहरात वेगवेगळ्या भागातून पोलिसांची गस्त, पोलिसांचा वावर वाढविला तर अशा घरफोड्यांचे प्रमाण कमी होऊ शकते त्या दृष्टीने पोलिसांनी नियोजन करावे, अशी मागणी जनता करत आहे

# जनावरे चोरी करणाऱ्या टोळीचे वाहनाचा अपघात

# गुंगीच्या इंजेक्शनसह संशयित कार नाल्यात कोसळली

**दैनिक वादळ वार्ता**
**महागाव । प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील मोहदी येथे रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास एक संशयित चारचाकी वाहन निर्माणाधीन पुलावरून नाल्यात कोसळल्याची घटना उघडकीस आली असून, हे वाहन जनावरे चोरी करणाऱ्या टोळीचे असावे असा संशय व्यक्त केला जात आहे. सदर वाहनाला कोणताही क्रमांक नसून वाहनातील सर्व आतील सीट काढून टाकण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे पोलिसांना वाहनातून तीन बेशुद्धीची इंजेक्शन मिळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.




अलीकडील काळात काळी दौलत व परिसरात जनावरे चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच जनावरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता मोहदी येथे सापडलेल्या वाहनामुळे या सर्व घटनांमागे एका संघटित टोळीचा हात असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार भरधाव वेगातील वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने निर्माणाधीन पुलावरून खाली कोसळले. अपघातानंतर वाहनातील संशयितांनी घटनास्थळावरून पळ काढल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी वाहन ताब्यात घेत तपास सुरू केला आहे.दरम्यान, परिसरातील काही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये याच प्रकारचे वाहन यापूर्वी जनावरे चोरीच्या घटनांच्या वेळी दिसून आले होते. त्यामुळे पोलिसांनी जुन्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून मोहदी येथे सापडलेल्या वाहनाशी त्याची पडताळणी करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.सदर वाहन जनावरे चोरी करून कत्तलीसाठी वापरणाऱ्या टोळीचे असू शकते, असा संशय व्यक्त केला जात असून, या टोळीला स्थानिक स्तरावरून मदत मिळत असल्याचीही चर्चा सुरू आहे. त्यामुळे पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# पुण्यात लग्नाला गेले अन मागे घर साफ झाले! तोफखाना परिसरात पावणेदोन लाखांची घरफोडी

## भुतेकरवाडी परिसरातील घटना; चोरट्यांनी सोन्याचे दागिने, रोकडसह लॅपटॉप केला लंपास

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पुणे येथे नातेवाइकाच्या लग्नकार्यासाठी गेलेल्या एका खाजगी नोकरदाराचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने, रोकड आणि लॅपटॉप असा एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. ही घटना भुतेकरवाडी परिसरातील पंपिंग स्टेशन रस्त्यावर ८ मे ते ११ मे दरम्यान घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजित प्रेमराज शेकडे (वय ५३, रा. पंपिंग स्टेशन रस्ता, भुतेकरवाडी, अहिल्यानगर) यांनी यासंदर्भात तोफखाना पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अजित शेकडे हे एका खाजगी कंपनीत नोकरीस आहेत. पुण्यातील नातेवाइकांकडे लग्न असल्याने ते ८ मे रोजी सकाळी १० वाजता आपल्या घराला कुलूप लावून कुटुंबासह

**असा झाला चोरीचा प्रकार**

शेकडे कुटुंब पुण्यात असताना, बंद घराची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी मुख्य दरवाजाचा कडी-कोंडा उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटाचे कुलूप तोडून आतील सामानाची उचकपाचक केली. कपाटात ठेवलेली १० ग्रॅमची एक आणि ५ ग्रॅमची एक अशा एकूण दोन सोन्याच्या अंगठ्या, ५० हजार रुपयांची रोकड आणि एक लॅपटॉप, असा एकूण १ लाख ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला.

शेकडे कुटुंब लग्न समारंभ आटोपून ११ मे रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास घरी परतले. त्यावेळी त्यांना घराच्या मुख्य दरवाजाचा कोंडा तुटलेला दिसला. आत जाऊन पाहिले असता सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. घरात मोठी चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने तोफखाना पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. चोरट्यांचा सुगावा लावण्यासाठी घटनास्थळी ठसेतज्ज्ञ आणि श्वानपथकालाही पाचारण करण्यात आले होते. या धाडसी घरफोडीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी या प्रकरणाचा कसोशीने तपास करीत आहेत.




# भिवंडीत हायप्रोफाईल देहविक्री रॅकेटचा पर्दाफाश ठाणे गुन्हे शाखेकडून महिला दलाल जेरबंद

## दोन पीडित महिलांची सुटका;काल्हेर परिसरातील लॉजिंगवर पोलिसांचा छापा

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे/भिवंडी । प्रतिनिधी**

भिवंडीतील काल्हेर परिसरात सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायावर ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (AHTU) मोठी कारवाई केली आहे. या छाप्यात पोलिसांनी एका महिला दलालाला अटक केली असून, तिच्या तावडीतून दोन असहाय्य महिलांची सुरक्षित सुटका केली आहे.ठाणे-भिवंडी रोडवरील काल्हेर येथील 'राजलक्ष्मी कंपाउंड'मध्ये असलेल्या 'सन लॉजिंग बोर्डिंग' (हॉटेल वंश किचन खाली) येथे एक महिला दलाल इतर महिलांना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध



कक्षाच्या पथकाने १२ मे २०२६ रोजी सायंकाळी ४:३५ च्या सुमारास या ठिकाणी सापळा रचला.सापळा रचून टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी संबंधित महिला दलालाला रंगेहाथ ताब्यात घेतले. तिच्या ताब्यात असलेल्या दोन पीडित महिलांची पोलिसांनी तात्काळ सुटका केली. या दोन्ही महिलांना सध्या सुरक्षेच्या कारणास्तव उल्हासनगर-५ येथील 'शांतिसदन' या शासकीय संरक्षण गृहात पाठवण्यात आले आहे.याप्रकरणी १३ मे २०२६ रोजी नारपोली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम १४३(१), १४३(३) आणि अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ च्या कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) विनय घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गोरडे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईमुळे भिवंडीतील अनैतिक व्यवसायांवर पोलीस प्रशासनाचा वचक निर्माण झाला आहे.

# म्हसोबावाडीत खरीप हंगामपूर्व शेतकरी प्रशिक्षण उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**इंदापूर । प्रतिनिधी**



म्हसोबावाडी (ता. इंदापूर) येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत खरीप हंगामपूर्व शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, हवामान बदल आणि पाणीटंचाई व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात मंडळ कृषि अधिकारी किरण पिसाळ तसेच सहाय्यक कृषि अधिकारी सचिन मोरे यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी चालू वर्षात कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, मोहिमा आणि त्यांचे महत्त्व याबाबत माहिती दिली.यावेळी माती परीक्षणाच्या आधारे कृषी निविष्ठांचा वाजवी वापर, पाणीटंचाईच्या परिस्थितीत फळबागा वाचविण्यासाठी उपाययोजना, फळबाग लागवडीत CRA तंत्रज्ञानाचा वापर, एल निनोच्या संभाव्य परिणामांविषयी जनजागृती, बीजप्रक्रिया, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, BBF पेरणी पद्धत, शून्य मशागत शेती, हुमणी कीड एकात्मिक व्यवस्थापन तसेच हिरवळीच्या खतांचे फायदे याबाबत सखोल माहिती देण्यात आली.तसेच पीक विमा व फळपीक विमा योजना, तसेच चरहरवलीं पोर्टलवर विविध योजनांसाठी अर्ज करण्याबाबतही शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यंदा एल निनोच्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून शेती करणे आवश्यक असल्याचे कृषि अधिकाऱ्यांनी सांगितले.या कार्यक्रमास सरपंच राजेंद्र राऊत, प्रगतशील महिला शेतकरी, कृषी सखी तसेच यशवंतराव नैसर्गिक शेती गटाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक कृषि अधिकारी पी. बी. काळे यांनी केले.

# रखडलेला बालगंधर्व पुरस्कार प्रदान करण्याच्या मागणीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला यश

दैनिक वादळ वार्ता
**हवेली । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणारा रखडलेला बालगंधर्व पुरस्कार वितरित करावा या मागणीचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर मनसे नेते बाबू वागसकर यांच्या नेतृत्वाखाली शहर सचिव रमेश जाधव,रवी सहाणे यांनी महापौर ,आयुक्त यांना दिले होते.पुरस्कार प्रदान करण्याबाबत २०२५ पासून सातत्याने पाठपुरावा केला होता.महापौर मंजूषा नागपुरे यांनी यंदाच्या बालगंधर्व जयंतीनिमित्त वितरण करण्याची सूचना प्रशासनाला केली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या सांस्कृतिक विभागातर्फे संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री निर्मला गोगटे यांना २०२० आणि शास्त्रीय गायिका डॉ. रेवा नातू यांना २०२१ सालचा महापालिकेच्या वतीने बालगंधर्व पुरस्कार जाहीर होऊन सहा वर्ष झाली. तरी पुरस्काराचे वितरण झाले नाही, याबाबत निर्मला गोगटे व डॉ. रेवा नातू यांना पुरस्कार देण्यास विलंब झाल्याबद्दल कळविण्याची तसदीदेखील घेतली नाही.

**मनसेची प्रतिक्रिया:**

कलाकारांचा सन्मान वेळेवर झाला पाहिजे. सहा वर्षे पुरस्कार रखडणे ही प्रशासनाची अनास्था आहे. आमच्या पाठपुराव्यामुळे का होईना पुरस्कार वितरित होत आहेत याचे समाधान आहे, अशी प्रतिक्रिया मनसे पदाधिकाऱ्यांनी दिली.

# फुलसांगवी येथील कोल्ड्रिंक्स गोदामाला भीषण आग;जीवितहानी टळली

दैनिक वादळ वार्ता
**महागाव । प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील फुलसांगवी येथे रस्त्यालगत असलेल्या एका कोल्ड्रिंक्स गोदामाला बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. प्रचंड उष्णतेच्या पार्श्वभूमीवर लागलेल्या या आगीत काही वेळातच संपूर्ण गोदाम जळून खाक झाले. घटनेनंतर परिसरात काळ्या धुराचे लोट पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



गोदामामध्ये कोल्ड्रिंक्सच्या पेट्या, बिसलेरी बाटल्या, फ्रिज, इन्व्हर्टर तसेच इतर साहित्य मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आले होते. आगीत अंदाजे १ लाख २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. महसूल प्रशासनाला तत्काळ माहिती देण्यात आली तसेच अग्निशमन दलालाही पाचारण करण्यात आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, गोदाम मालकाने नुकसानभरपाईची मागणी केली आहे. महागाव नगरपंचायतीच्या फायर ब्रिगेडवर प्रश्नचिन्ह या घटनेनंतर महागाव नगरपंचायत यांच्या फायर ब्रिगेड व्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. लाखो रुपये खर्च करून खरेदी करण्यात आलेली फायर ब्रिगेड गाडी अनेक महिन्यांपासून बंद अवस्थेत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे आग विझवण्यासाठी वेळेत मदत मिळू शकली नाही.परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अखेर उंबरखेड नगरपालिका येथून फायर ब्रिगेड गाडी बोलवावी लागली. तालुक्याच्या ठिकाणी असलेली फायर ब्रिगेड गाडी केवळ शोभेची वस्तू बनल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत असून प्रशासनाविरोधात नाराजी वाढताना दिसत आहे.

# विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीपत्र वितरण सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**कवठे महांकाळ । प्रतिनिधी**

सांगली येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समिती सभागृहात बुधवार दिनांक १३ मे रोजी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रम पार पडला.यावेळी जिल्हाधिकारी डॉ.मैनाक घोष,आमदार सुधीरदादा गाडगीळ,भाजपाचे सांगली शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग,सांगली ग्रामीण जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक,भाजपचे राज्य परिषद सदस्य मिलिंद कोरे,जिल्हा सरचिटणीस विलास काळेबाग तसेच इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

सांगली जिल्हा सीमांतर्गत क्षेत्रासाठी शासन निर्णयान्वये करण्यात आलेली ही नियुक्ती अत्यंत महत्त्वपूर्ण असून,समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय,सेवा आणि शासकीय योजनांचा लाभ पोहोचवण्याची जबाबदारी सर्व अधिकाऱ्यांवर



असल्याचे यावेळी पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी नमूद केले.पदाचा वापर हा केवळ सन्मानासाठी नसून नागरिकांना न्याय देण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी व्हावा,अशी अपेक्षा व्यक्त करत अधिकाऱ्यांनी सजग,सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचे आवाहन देखील यावेळी चंद्रकांतदादा पाटील यांनी उपस्थितांना केले.

कवठे महांकाळ तालुक्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या जवळपास चाळीस नागरिकांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.यापैकी छत्रपती शिवाजी महाराज विकास सोसायटी,रांजणीचे चेअरमन विकास भोसले,महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र गाडवे,शहरातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे पत्रकार ड.सचिन गायकवाड,प्रगतशील शेतकरी तसेच जनसेवेत अग्रेसर तरुण व्यक्तिमत्व युवराज कोठावळे,गोवर्धन को-ऑप.क्रेडिट सोसायटी तसेच अग्रणी सहकारी दुग्ध उत्पादक व पुरवठा संस्थेच्या संचालिका सौ.अश्विनी कोळेकर आणि शहरातील प्रसिद्ध महिलातज्ञ असलेल्या डॉक्टर सौ.पूजा पाटील यांना आज नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

ही जबाबदारी केवळ पद नसून जनतेशी थेट जोडणारा एक महत्त्वाचा दुवा आहे.ओळख व रहिवासी प्रमाणपत्रे,शासकीय योजनांचा प्रसार तसेच पोलीस प्रशासनास सहकार्य या माध्यमातून सर्वसामान्यांची कामे अधिक वेगाने,पारदर्शकपणे आणि प्रभावीपणे होतील.जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहत दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत समाजहिताला प्राधान्य द्याल,या अपेक्षा नियुक्तीपत्र प्रदान केलेल्या तालुक्यातील विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांशी बोलताना भाजपचे राज्य परिषद सदस्य मिलिंद कोरे यांनी व्यक्त केल्या.यावेळी विक्रम कोळेकर,ओंकार पाटील आणि मनोज देसाई उपस्थित होत

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077